**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.शिरीष सदाशिव पिंगळे
विभागप्रमुख, रसायनशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.शिरीष सदाशिव पिंगळे
विभागप्रमुख, रसायनशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे प्रतिनिधी श्री.बी.डी.उढाणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे श्रीमती अरूणा चव्हाण

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

रसायनशास्त्र विभागात पीएच.डी.करणाऱ्या श्री.आर.डी.देशमुख या विद्यार्थ्याने आपल्या प्रबंधामधील मुख्य भाग कॉपी करून स्वतःच्या प्रबंधात समाविष्ट केला आहे. त्याबाबत आपण एका संशोधनपत्रिकेकडे आक्षेप नोंदविला असून या प्रबंधाची प्रत व श्री.देशमुख यांना पीएच.डी.साठी मान्यता देणाऱ्या पत्राची प्रत मिळावी, अशी मागणी आपण केली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे यांनी माहिती दिली नाही. या संदर्भात आपण पाठविलेल्या पत्रावरील कार्यवाहीचीही योग्य माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ.शिरीष सदाशिव पिंगळे यांनी केली.

अन्य व्यक्तीच्या अप्रकाशित व अद्याप मान्य झाला नसलेल्या प्रबंधाची प्रत उपलब्ध करून देता येणार नाही. तसेच डॉ.पिंगळे यांनी केलेल्या तक्रारीबाबत चौकशी करण्यासाठी विद्यापीठाने समिती नियुक्त केली असून समितीचा निर्णय झाल्यानंतर त्यानुसार माहिती देण्यात येईल, असे कळविले. तसेच सदर प्रकरणी अध्यादेश १५७ नुसार कार्यवाही करण्याचे आदेश विद्यापीठाच्या कुलगुरूंनी दिलेले आहेत. ही कार्यवाही अद्याप चालू आहे. ती पूर्ण होताच डॉ.पिंगळे यांना तपशील दिला जाईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे श्रीमती अरूणा चव्हाण यांनी केले.

एका समितीने चौकशी करून अहवाल दिला. त्याची प्रत डॉ.पिंगळे यांना दिली आहे. या अहवालानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत विद्यापीठाने समिती नेमलेली असून साधारणतः महिन्याभरात त्यांचे काम पूर्ण होईल. त्यानंतर माहिती देता येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.बी.डी.उढाणे यांनी केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र श्री.आर.डी.देशमुख यांच्या पीएच.डी. प्रबंधाच्या मान्यतापत्राची साक्षांकित प्रत डॉ.पिंगळे यांना द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन

माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे श्रीमती अरूणा चव्हाण यांनी दि.२५.५.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नामदेव बाबासाहेब खरात
रा.नितीराज निवास,निरा,
ता.पुरंदर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती माण (दहिवडी),
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी,**
पंचायत समिती माण (दहिवडी),
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८०/पुणे |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००७-०८ या वर्षी अंगणवाडी सेविका निवड परीक्षेत श्रीमती दिपाली सोमनाथ राऊत यांना ज्या कागदपत्रांच्या आधारे गुण दिले त्या कागदपत्रांच्या छायाप्रती, श्रीमती राऊत यांचे अंगणवाडी कोर्स प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, अनुभवाचा दाखला, जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र इ. माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य

अधिकारी, पंचायत समिती, माण (दहिवडी), जि.सातारा यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माण (दहिवडी), जि.सातारा यांनी दिलेला निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अनिल बबनराव गलांडे
शांभवी, अशोकनगर, ता. बारामती, जि. पुणे .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह धर्मादाय आयुक्त,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे-१ .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८९ / /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.३.२०१० |
| **३** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सह धर्मादाय आयुक्त,<br>धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे-१ तर्फे प्रतिनिधी श्री. अ.आ. पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,<br>धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे-१ श्री. अ.आ. पाटील | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्याने दि. ३०.३. २०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. अनिल बबनराव गलांडे यांनी एका विश्वस्त संस्थेच्या संदर्भात काही गृहितावर आधारित माहिती नमूद करुन संभाव्य कारवाईबाबत विचारणा केली आहे. त्याचे उत्तर देण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण बाबुराव सुतार
राजेंद्रनगर, १००५/३, शिवगौरी सोसायटी, महानगरपालिका कॉलनी, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(सेवकवर्ग),
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सेवकवर्ग विभाग प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७ /२०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण बाबुराव सुतार
राजेंद्रनगर, १००५/३, शिवगौरी सोसायटी, महानगरपालिका कॉलनी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सेवकवर्ग),
पुणे महानगरपालिका, पुणे प्रतिनिधी श्री.शिवाजी दौंडकर

**जन माहिती अधिकारी** तथा सेवकवर्ग विभाग प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.के.टी.भोईर

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पुणे महानगरपालिकेच्या सन १९९६च्या ठरावाबाबतची माहिती आपण मागितली होती. विषयाला सोडून माहिती दिली. प्रशासनाने महानगरपालिकेच्या आमसभेपासून वस्तुस्थिती दर्शक माहिती लपवून ठेवून वेगळा ठराव मंजूर केला. या सर्व प्रकरणात प्रत्यक्षात दखलपात्र गुन्हा करणाऱ्यांना पाठीशी घालण्यात आले आणि आपल्याला नोकरीमधून काढून टाकले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.नारायण बाबुराव सुतार यांनी केले.

दि.२६.१२.१९९६ चा महानगरपालिकेचा ठराव आहे. शासनाकडून आलेल्या पत्रात १९९६ ऐवजी १९९९ साल चुकून पडले आहे, म्हणून दि.२६.१२.१९९९ च्या ठरावाची कागदपत्रे मागून ती मिळत नसल्याची तक्रार अपीलकर्ता करीत आहेत. सन १९९९ ऐवजी १९९६ अशी दुरूस्ती करावी याबाबत शासनाशी पत्रव्यवहारही करण्यात आलेला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सेवकवर्ग विभागप्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.के.टी.भोईर यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

खोटी कागदपत्रे करण्यात आल्याचा आरोप श्री.सुतार यांनी केला. या व श्री.सुतार यांच्या अन्य तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. दि.२६.१२.१९९६ ऐवजी दि.२६.१२.१९९९ असे चुकून नमूद झाले आहे, या आशयाचे पत्र व त्या संदर्भात दुरूस्तीसाठी शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत अपीलकर्त्यास द्यावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनील श्रावण शिंदे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसाहत, बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम, पूर्व विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बारामती, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५१/ २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम, पूर्व विभाग, पुणे श्री.अे.बी.चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.एस.एस.बागुल

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुनील श्रावण शिंदे यांनी सरसकट व विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. ठराविक कामाची माहिती त्यांनी मागितल्यास देता येईल, अन्यथा अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक असलेल्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रती त्यांना उपलब्ध करून देता येतील, असे त्यांना कळविले होते. त्यानुसार त्यांनी अवलोकन केले असून संपूर्ण समाधान झाल्याचे व त्यामुळे लेखी माहितीची आवश्यकता नसल्याचे लेखी निवेदन दि.१५.१२.२००९ च्या पत्रान्वये अपीलकर्ता श्री.सुनिल श्रावण शिंदे यांनी दिले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.एस.एस.बागुल व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे श्री.अे.बी.चव्हाण यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अजय कुडके
द्वारा ॲड.एल.के.झुनझुनवाला,
ओम-ॲन इन्स्टीटयूट ऑफ सोशल लीगल सर्व्हीसेस,
५/१३६३ कृष्णा अपार्टमेंट, टायटॅन शोरूम, शिवाजीनगर, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ-३, पुणे शहर, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
चतु:शृंगी विभाग, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
चतु:शृंगी विभाग, पुणे शहर श्री.वि.रा.माने

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.८.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.९.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.९.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.१०.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

दोन दिवसांत पुणे जिल्ह्याची हद्द सोडून जाण्याचे पोलिसांचे आदेश असताना २४ तासात आपल्याला तडीपार का करण्यात आले, अशा स्वरूपाची व त्या अनुषंगाने अन्य मुद्दयांबाबत खुलाशाची विचारणा अपीलकर्ता श्री.अजय कुडके यांनी केली होती. अपीलकर्ता सन २००८ चा तडीपार असून केलेली विचारणा भाष्य, अन्वयार्थ, खुलासा या स्वरूपाची आहे. तरीही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर यांनी संबंधित पोलीस ठाण्याकडून माहिती प्राप्त करून घेऊन मुद्देनिहाय उत्तर दिले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, चतु:श्रृंगी विभाग, पुणे शहर श्री.वि.रा.माने यांनी केले. माहितीबाबत त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.शैलजा रामचंद्र आंद्रे
बिल्डिंग नं.२३, एफ-३, दौलत हौसिंग सोसायटी,
तळेगाव-दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मंडल अधिकारी,
खडकाळ, कामशेत, ता.मावळ,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** गावकामगार तलाठी,
मौजे खडकाळ, कामशेत, ता.मावळ,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४२/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** सौ.शैलजा रामचंद्र आंद्रे
बिल्डिंग नं.२३, एफ-३, दौलत हौसिंग सोसायटी,
तळेगाव-दाभाडे, ता.मावळ,जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** मंडल अधिकारी,
खडकाळ, कामशेत, ता.मावळ,जि.पुणे श्री.हेमंत दौलतराव चव्हाण

**जन माहिती अधिकारी तथा** गावकामगार तलाठी,
मौजे खडकाळ, कामशेत, ता.मावळ,जि.पुणे श्री.पी.ए.ढावरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०२.०९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.०९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०८.१०.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

प्रत्यक्ष विक्रीच्या क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र ७/१२ उताऱ्याला दाखविले त्याचा ताळमेळ घालून चुकीची नोंद दुरुस्त केली पाहिजे. ज्या कागदपत्रांच्या आधारे भूखंडाची खरेदी विक्री झाली ती कायदेशीर आहे का ? याची माहिती दिली पाहिजे, अशी मागणी अपीलकर्त्या सौ.शैलजा रामचंद्र आंद्रे यांनी केली.

संबंधित नोंदी ८-१० वर्षांपूर्वीच्या आहेत. त्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास दिल्या आहेत. परंतु क्षेत्र दुरुस्तीबाबत तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे. ही बाब, तसेच कागदपत्रांच्या व कार्यवाहीच्या कायदेशीर-बेकायदेशीरपणाबाबतचा अभिप्राय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही.असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी, मौजे खडकाळ, कामशेत, ता.मावळ,जि.पुणे श्री.पी.ए.ढावरे व अपिलीय प्राधिकारी तथा मंडल अधिकारी, खडकाळ, कामशेत, ता.मावळ,जि.पुणे श्री.हेमंत दौलतराव चव्हाण यांनी केले. ते मान्य करण्यात येत आहे. अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ निर्णयार्थ येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 21 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर ज्ञानू खलसे
स.नं.११६/२, वाल्हेकरवाडी, भोंडवेनगर,
चिंचवड,पुणे-३३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहाय्यक आयुक्त
'ब' प्रभाग कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, चिंचवड-३३

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक आरोग्य अधिकारी,
'ब' प्रभाग कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, चिंचवड-३३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४६+२६९९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.०४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर ज्ञानू खलसे
स.नं.११६/२, वाल्हेकरवाडी, भोंडवेनगर, चिंचवड,पुणे-३३

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहाय्यक आयुक्त
'ब' प्रभाग कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, चिंचवड-३३ श्री.दिलीप काशिनाथ गावडे

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक आरोग्य अधिकारी,
'ब' प्रभाग कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, चिंचवड-३३ श्री.बळवंत शा. नाममूरकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.०७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.०८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०६.०९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.०९.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपले वडील सन १९९१ पासून पुणे महानगरपालिकेमध्ये कामाला होते. वारंवार मागणी करुनही त्यांच्या सेवा नोंद पुस्तकाची प्रत दिली जात नाही. महानगरपालिकेच्या 'ब' प्रभागाकडून नियुक्तीचा आदेश मिळाला असून अन्य कागदपत्रे वाहून गेल्यामुळे पुराव्यासाठी सादर करता येत नाहीत. असे निवेदन अपीलकर्ता श्री.शंकर ज्ञानू खलसे यांनी केले.

अपीलकर्त्यांचे वडील कै.ज्ञानू भाऊ खलसे हे कधीही 'ब' प्रभागात कामाला नव्हते. श्री.खलसे यांच्या मागणीच्या अनुषंगाने अ,ब,क,ड विभागामध्ये शोध घेतला असता ते 'ड' विभागात होते, असे स्पष्ट झाले. त्यांना निलंबित करण्यात आले होते. जुलै १९९१ पासूनची हजेरी पत्रकांच्या प्रती, सेवा निलंबनाच्या आदेशाची प्रत आदि सर्व माहिती त्यांना देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आरोग्य अधिकारी, 'ब' प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, चिंचवड श्री.बळवंत शा. नाममूरकर व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त 'ब' प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, चिंचवड श्री.दिलीप काशिनाथ गावडे यांनी केले. माहिती मिळाल्याची दि.१३.०४.२००९ ची श्री.खलसे यांची पोचही त्यांनी सादर केली.

अपीलकर्त्यांनी नेमकेपणाने तपशील देऊन माहिती मागितलेली नव्हती. तरीही जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आरोग्य अधिकारी, 'ब' प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, चिंचवड श्री.बळवंत शा. नाममूरकर व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त 'ब' प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, चिंचवड श्री.दिलीप काशिनाथ गावडे यांनी शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती दिली आहे, हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि.** 21 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विठ्ठलराव मार्तंडराव काळे
मु.पो.घोडेगांव,
ता.आंबेगाव, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ढोले-पाटील रोड, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी सचिव,**
आंबेगांव विद्या विकास मंडळ,
घोडेगांव, ता.आंबेगांव,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४९/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आंबेगाव विद्या विकास मंडळ, घोडेगांव, ता.आंबेगाव या संस्थेच्या संचालक मंडळाच्या संदर्भातील एकूण ५ मुद्दयांची सविस्तर माहिती. | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. विठ्ठलराव मार्तंडराव काळे यांनी सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
दि :- 18 JUN 2010

माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय मनोहर गुटाळ
मु.पो.पांगरे, ता.करमाळा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, राष्ट्र जागृती बहुउद्देशीय मंडळ,
जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५६ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय मनोहर गुटाळ
मु.पो.पांगरे, ता.करमाळा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर
प्रतिनिधी श्री.डी.बी.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, राष्ट्र जागृती बहुउद्देशीय मंडळ,
जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.एम.बी.नुरले

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राष्ट्रीय जागृती बहुउद्देशीय मंडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या शाळेसाठी कवीट या गावाकरता मान्यता असून प्रत्यक्षात शाळा पांगरी या गावी चालविली जाते. मुख्याध्यापकांची निवड करताना नियमांचे पालन केलेले नाही. शाळेचे नाव बदलण्यासाठी परवानगी घेतली की नाही, हे स्पष्ट होत नाही. विद्यार्थ्यांची नावे आदी तपशील दिला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संजय मनोहर गुटाळ यांनी केली.

श्री.गुटाळ यांनी विस्तृत व सरसकट स्वरूपात माहिती मागितली आहे. पूर्ण माहिती दिलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, राष्ट्र जागृती बहुउद्देशीय मंडळ, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.एम.बी.नुरले यांनी केले.

आपल्याकडे केलेल्या अपिलाच्या सुनावणीला अपीलकर्ता हजर नव्हते. त्यामुळे पुढील तारीख दिली असून त्यापूर्वीच श्री.गुटाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.डी.बी.पवार यांनी केले.

अपीलकर्त्यास द्यावयाच्या माहितीत विद्यार्थ्यांची नावे दिली, तरी त्यांचे निवासी पत्ते देऊ नयेत. तसेच राष्ट्रीय जागृती बहुउदेशीय मंडळ, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण ठरते, याबद्दलचे पुरावे अपीलकर्त्याने सादर करावेत, असे आयोगाने दि.१०.२.२०१० च्या पत्रान्वये

श्री.गुटाळ यांना कळविले होते. तसे कोणतेही पुरावे त्यांनी सादर केलेले नाहीत. वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नरेश बनारसीदास आगरवाल
सर्व्हे नं.११९, कळस,
पुणे आळंदी रोड, पुणे-१५

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (जिं.घ.) कार्यालय,**
पुणे महानगरपालिका,
पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सेवक वर्ग विभाग अधिकारी,**
पुणे महानगरपालिका
पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०८/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** क्षेत्रिय कार्यालय, संगमवाडी येथे कार्यरत असलेले श्री.वसंत पाटील यांच्या सेवा तपशिलासंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.नरेश बनारसीदास आगरवाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सेवक वर्ग विभाग अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश गणपत कदम
स.नं.२८३/११, मोरया कॉलनी, तापकीरनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, प्रशासन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महेश गणपत कदम
स.नं.२८३/११, मोरया कॉलनी, तापकीरनगर, काळेवाडी, पिंपरी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे री.बाळू गेनू पवार

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापनेपासून वर्ग-१ व वर्ग-२ बाबतच्या अधिकाऱ्यांची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी अपूर्ण दिली. माहिती विस्तृत असल्यामुळे देता येणार नाही. विशिष्ट नावे नमूद करून एखाद-दुसऱ्या अधिकाऱ्याची माहिती देता येईल, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, प्रशासन, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी दिला. त्यामुळे माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.महेश गणपत कदम यांनी केली.

श्री.कदम यांनी २८ वर्षांच्या काळातील अत्यंत विस्तृत अशी माहिती मागितली आहे. तशी माहिती संकलित करून देणे शक्य नाही. प्रत्येक खात्याला स्वतंत्र जन माहिती अधिकारी आहेत. त्यांच्याकडून काही अधिकाऱ्यांबाबत माहिती मागितल्यास देता येईल. अन्यथा २८ वर्षांतील अभिलेखाचे अवलोकन करून कागदपत्रांची मागणी केल्यास प्रती देता येतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.बाळू गेनू पवार यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही व त्यांचे प्रतिपादन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

प्रा. रमेश केशवराव वानखडे
अ/१३/३०३, प्लॅनेट मिलेनियम,
पिंपळे सौदागर, पुणे-२७

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण सहसंचालक,**
उच्च शिक्षण, पुणे विभाग,
पुणे -१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण यांचे कार्यालय,
पुणे विभाग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६४०/पुणे (अ) |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** भूगोल विशेषस्तर विषयासंबंधित थकित वेतनाची रक्कम, अनुदान मंजुरी, प्राप्त अनुदान तदनुषंगिक एकूण १३ मुद्दयांची विस्तृत माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता प्रा.रमेश केशवराव वानखडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ व जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी अपिलासोबत सादर केलेली अन्य कागदपत्रे विचारात घेता अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, यांनी दि.३/११/२००८ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दामोदर दशरथराव शिनगारे
द्वारा कृषि उत्पन्न बाजार समिती, **अपीलकर्ता**
केज, जि.बीड,

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
सेवा निवृत्ती वेतन योजना,
महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित,
गुलटेकडी मार्केट यार्ड,
भूखंड डी., पुणे-३७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,**
सेवा निवृत्ती वेतन योजना,
महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित,
गुलटेकडी मार्केट यार्ड,
भूखंड डी., पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८३/पुणे |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडलेली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२०/०१/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. दामोदर

दशरथराव शिनगारे हे अनुपस्थित होते. 'श्री. शिनगारे यांचा मूळ माहिती अर्ज दि.१५/०३/२००८ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर त्यांना दि.२१/०४/२००८ रोजी माहितीसाठीचे शुल्क कळविले व शुल्क प्राप्त झाल्यानंतर दि.६/०५/२००८ रोजी त्यांना त्यांच्या माहिती अर्जातील मुद्द क्र. ३ ते ८ बाबतची माहिती देण्यात आली. ऊर्वरित मुद्दा क्र. १ व २ ची माहिती दि.३०/०५/२००८ रोजी देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलाची सुनावणी देखील मुदतीत घेण्यात आलेली आहे. अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती ही कार्यालयीन कामकाज पाहून व उपलब्धतेनुसार देण्यात आलेली असून, जादा वेतन वाढीचा निर्णय हा मूल्यांकनानुसार व पणन संचालक, तसेच समितीच्या मंजुरीनंतरच घ्यावा लागणार होता. त्यामुळे निर्णयास व माहितीस विलंब झालेला आहे', असे जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सेवा निवृत्ती वेतन योजना, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, पुणे श्रीमती एम.एन.जगताप व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, सेवा निवृत्ती वेतन योजना, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, पुणे श्री.डी.एम.जगताप यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 24 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

ॲड. विजयराव ज्ञानेश्वर दाभाडे .. अपीलकर्ता
रा. यशवंतनगर, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, जि. पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाययक नगरचनाकार,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २१.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,<br>तळेगाव दाभाडे नगरपरिषद, जि. पुणे श्री. एस. के. देसाई<br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगरचनाकार,<br>तळेगाव दाभाडे नगरपरिषद, जि. पुणे श्री. राहुल रा. दिवेकर | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २१.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता ॲड. विजयराव ज्ञानेश्वर दाभाडे यांनी मागितलेली सर्व माहिती दिली. उपरोक्त अर्जामध्ये ॲड. दाभाडे यांनी खुलासे, न्यायिक कामकाजावरील भाष्य अशा स्वरूपाची मागणी केली आहे. (उदा. असा अर्थ होतो काय, कायदेशीर कारवाईबाबत विलंब का करीत आहेत ) अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तरीही मुद्देनिहाय उत्तर दिले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, तळगाव दाभाडे नगरपरिषद श्री. राहुल रा. दिवेकर यांनी केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 JUN 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ